(Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधान:" इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT

वर्ष १५ | पुणें, बुधवार तारीख २७ मे, १९५९ | अंक ११

## विविध माहिती

**जंगलें वाढविण्याचा कार्यक्रम**—तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत जंगलाखाली असणाऱ्या जमिनीची वाढ करण्याचा कार्यक्रम मध्यवर्ती जंगल बोर्डानें आखला आहे. कार्यक्रम अंमलांत आणण्यासाठी ५० कोटी रुपये खर्च येणार आहे. जंगलवाढीच्या कार्यक्रमासाठी ५,००० अधिकाऱ्यांना एक वर्षभर खास शिक्षण देण्यांत येणार आहे.

**दिल्लीमधील पाण्याचा पुरवठा**—दिल्ली शहराला भासणारी पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी एक ब्रिटिश पाणाड्या प्रयत्न करणार आहे. त्याच्या मतानें दिल्लीच्या खाली भूमिगत पाण्याचा बराच साठा आहे. ह्या साठ्याचा उपयोग करून शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न सोडविता येईल, असें तो म्हणतो. अद्याप त्याच्या म्हणण्याप्रमाणें विहिरी खणण्याचें काम सुरू करण्यांत आलेलें नाहीं.

**लुनेज येथील तेलाच्या खाणी**—खंबायतच्या आखाताजवळ लुनेज येथें सांपडलेल्या तेलाच्या खाणीला रशियन भूस्तरमंत्रि मि. अँट्रॉपॉव्ह ह्यांनीं भेट दिली. लुनेज येथील खाणींत मोठ्या प्रमाणावर तेल सापडेल असें मत त्यांनीं व्यक्त केलें व आणखी दोन ठिकाणीं विहिरी खोदण्याचें काम चालूं करण्याविषयीं शिफारस केली.

**रेल्वे स्टेशनवरील निवेदकांना शिक्षण**—रेल्वे स्टेशनवर उतारूंना मार्गदर्शन करण्यासाठी निवेदक ठेवलेले असतात. निवेदक मुख्यत: गाड्यांच्या जाण्यायेण्याच्या वेळा सांगत असतात. त्यांचीं निवेदनें अधिक परिणामकारक करण्यासाठी निवेदकांना ऑल इंडिया रेडिओतर्फे शिक्षण देण्यांत येणार आहे.

**उतारूंनीं अपघात टाळला**—बंगलोर शहरांतील उतारूंची वहातूक करणारी एक बस उतारावरून जात असतां गाडीचे ब्रेक लागत नसल्याचें आढळून आलें. त्याबरोबर गाडीच्या ड्रायव्हरनें आंतील ४५ उतारूंना ब्रेक लागत नसल्याबद्दल मोठ्यानें घोषणा करण्यास सांगितलें. उतारूंच्या ओरडण्यामुळें पादचारी लोक भराभर मागें होत व बसला वाट करून देत. त्यामुळें मोठा आपघात टळला.

**सरकारवरील टीका टाळण्याचा उपाय**—मध्यवर्ती वहातुकमंत्रि श्री. स. का. पाटील एका प्रसंगीं बोलतांना म्हणाले, कीं सरकारनें लोकांच्या मनोरंजनाची भरपूर सोय केली पाहिजे. लोकांचीं मनें नेहमीं कशांत तरी गुंतवून ठेवण्यांत आलीं पाहिजेत. तीं इतकीं कीं, फक्त निवडणुकांच्या वेळींच सरकारवर टीका करण्याची उसंत लोकांना मिळाली पाहिजे.

**भूदानमोहिमेची निष्पत्ति**—सर्वोदयवादी पुढारी श्री. जयप्रकाश नारायण ह्यांनीं असें जाहीर केलें आहे कीं, भूदानमोहिमेंत आतांपर्यंत ६ लाख लोकांनीं मिळून ५० लाख एकर जमीन दिली आहे. गेल्या आठ वर्षांत सर्वोदयाच्या चळवळीनेंहि बरीच प्रगति केली असून लाखों लोकांच्या कानावर सर्वोदयाचा आवाज गेला आहे असेंहि ते म्हणाले.

**काथ्याच्या मालाची निर्यात**—काथ्याच्या मालाची निर्यात अमेरिकेंत वाढविण्यासाठी भारतीय काथ्याबोर्डाचे तीन प्रतिनिधी अमेरिकेला गेले आहेत. प्रतिनिधींनीं काथ्यापासून तयार करण्यांत येणाऱ्या मालाची माहिती पत्रकारांच्या बैठकींत सांगितली. प्रतिनिधी अमेरिकेंतील प्रमुख शहरांचा दौरा करणार आहेत.

**तिबेटच्या निर्वासितांना काम**—तिबेटमधील घडामोडींमुळें भारतांत आलेल्या तिबेटी निर्वासितांची संख्या १२,००० पेक्षा अधिक झाली आहे. ह्या निर्वासितांची वर्गवारी करून त्यांना काम देण्याचा प्रयत्न हिंदी अधिकारी करीत आहेत. तिबेटांतून भारतांत आलेल्या निर्वासितांत २८० स्त्रिया व ११५ मुलें आहेत. आणखी तिबेटी निर्वासित भारतांत येतील असा अंदाज आहे.

**भिलइ येथील पाण्याचा पुरवठा**—भिलई येथील पोलादाच्या कारखान्यासाठी व तेथें वसलेल्या गांवासाठी पाणीपुरवठा करणाऱ्या व्यवस्थेचा पहिला टप्पा पुरा झाला आहे. संपूर्ण व्यवस्था अंमलांत येण्यास ४८ लाख रुपये खर्च येईल व मग भिलईला २४ तास पाण्याचा पुरवठा होऊं लागेल. सध्यां दररोज ३५ लाख गॅलन पाणी पुरविण्यांत येत आहे.

**शहा अलमच्या कारकीर्दीमधील नाणीं**—पूर्व पाकिस्तानांत खुलना जिल्ह्यांत एक तळें खोदण्यांत येत असतां सम्राट शहा अलमच्या कारकीर्दींतील ४६ सोन्याचीं नाणीं सांपडलीं आहेत. प्रत्येक नाण्याचें वजन १। तोळा आहे. नाण्यावर पर्शिअन लिपींतील अक्षरें आहेत. तीं अगदीं कोरी करकरीत दिसत असून मुर्शिदाबाद येथील टाकसाळींत पाडण्यांत आलेलीं आहेत.

**मक्याच्या एकरी पिकांत वाढ**—काश्मीर सरकारच्या शेतकी खात्यानें अधिक पीक देणाऱ्या मक्याच्या बियाणाचा शोध लावला आहे. ह्या नवीन जातीच्या मक्याचें पीक एका एकरांत ३९ मण येऊं शकतें. नेहमींच्या मक्याचें पीक दर एकरीं १२ मण येतें. पुढील वर्षी सुमारें १०,००० एकर जमिनींत नवीन जातीच्या मक्याचें बियाणें पेरण्याचा खात्याचा विचार आहे.

**सुदानचा तेलासाठी शोध** सुदानच्या सरकारनें एका इटालिअन सरकारी मालकीच्या कंपनीशीं करार करून सुदानमधील तेल शोधण्याचे हक्क तिला दिले आहेत. तेलाच्या शोधासाठी सरकारनें केलेला हा पहिलाच करार आहे. करारांतील अटीप्रमाणें नफा होऊं लागल्यावर त्यांतील निम्मा नफा सरकारला मिळणार आहे.

**अल्फ्रेड क्रप ह्यांची कराचीला भेट**—प्रसिद्ध जर्मन उद्योगपति अल्फ्रेड क्रप जपानहून परत येतांना वाटेंत कराचीला एक दिवस थांबले होते कराचीला त्यांनीं सरकारी अधिकाऱ्यांची व पाकिस्तान औद्योगिक विकास मंडळाच्या अध्यक्षांची गांठ घेतली. पाकिस्तानांत पोलादाचा कारखाना काढण्याबद्दल बोलणीं करण्यांत आलीं असें समजतें.

**कर चुकविणारांविरुद्ध उपाय**—पंजाब सरकारनें कर चुकविणाऱ्यांविरुद्ध कडक उपायांची योजना करण्याचें ठरविलें आहे. त्याचप्रमाणें, जमीनमहसुलाची थकबाकीहि कडक उपायांनीं वसूल करण्यांत येणार आहे. सरकारला पैशाची टंचाई भासत असल्यानें ही मोहीम उभारण्यांत येत आहे. असें केलें नाहीं तर आणखी नवीन कर बसविण्याची पाळी सरकारवर येण्याचा संभव आहे.

**सीलोनमध्यें तामीळ विद्यापीठ**—सीलोनमध्यें त्रिंकोमाली येथें तामीळ विद्यापीठ स्थापन करण्यांत येणार आहे. विद्यापीठाचा कोनशिला समारंभ नुकताच साजरा झाला. विद्यापीठाच्या इमारतीसाठी लागणारा खर्च तामीळ विद्यापीठ संघटना करणार आहे इमारती बांधून झाल्यावर सीलोन सरकारला विद्यापीठास मान्यता देण्याची विनंती करण्यांत येईल.

**वाजवी किंमतींत साखरेची विक्री**—उत्तरप्रदेश सरकारचे मुख्यमंत्रि डॉ. संपूर्णानंद ह्यांनीं गाझिआबाद येथें बोलतांना असें सांगितलें कीं, सरकार लवकरच वाजवी दरानें साखरेची विक्री करणारीं दुकानें उघडणार आहे. साखर ३६ रुपये मण ह्या दरानें विकण्यांत येईल. साखरेच्या किंमतींत झालेली वाढ दलालांच्या कारवायांमुळें झाली आहे, असेंहि ते म्हणाले.

**विजेसाठीं टर्बाइन्स देण्याची तयारी**—भाक्रा नांगल येथील वीज निर्माण करणाऱ्या दुसऱ्या केंद्राची उभारणी करण्याचें काम लवकरच सुरू होणार आहे. ह्या केंद्रांत ९०,००० किलोवॅट वीज निर्माण करण्यांत येईल. केंद्रासाठीं लागणारी प्रचंड टर्बाइन्स रशिआकडून मिळण्याची शक्यता आहे. पहिल्या वीजनिर्मिती-गृहाची टर्बाइन्स युगोस्लाव्हिआ व जपानकडून आणली होती.


* दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड *

( शिड्यूल्ड बँक )

हेड ऑफिस :–१० बुधवार पेठ, पुणें २
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग ( फोन ६५६३ )

अध्यक्ष
श्री. ग. रा. साठे

मुंबई शाखा :–८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १
कॉमनवेल्थ बिल्डिंग, ( फोन २५३४०८ )

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल ... ... रु. ७,३०,४९०
खेळतें भांडवल ... ... रु.५८,००,०००

★ चालू खातें व्याज १ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज १¾% टक्के ★ मुदत ठेवींवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए., (ऑ.), बी. कॉम्., एल्एल्. बी. मॅनेजर



अन्नाचें रहस्य





बेडेकर मसाले, लोणचीं, पापड ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★

दुकानें—गिरगांव, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ

— द. ना. हेर्जीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —





किर्लोस्कर

इलेक्ट्रिक पंपिंग सेट

यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाळ टिकाऊ.
[illegible]
अधिक माहितीसाठीं लिहा.

किर्लोस्कर ब्रदर्स लि., किर्लोस्करवाडी, द. सातारा.

# अर्थ

बुधवार, ता. २७ मे, १९५९





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## १९५८ मधील हिंदी बँकिंग

### ठेवी वाढल्या, पण कर्जास मागणी नाहीं

बँकिंग कंपन्यांच्या कायद्याखाली रिझर्व्ह बँक दरसाल हिंदी बँकिंगच्या परिस्थितीविषयीं अहवाल तयार करीत असते. त्याप्रमाणें १९५८ सालविषयक अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे.

१९५८ मध्यें पब्लिक सेक्टरमधील गुंतवणूक वाढली, परंतु प्रायव्हेट सेक्टरमध्यें मात्र अपेक्षेप्रमाणें गुंतवणूक झाली नाहीं. शेतीचें उत्पादन ८% नें घटलें. औद्योगिक उत्पादनांत वाढ झाली तरी त्याची गति कमी झालेली आढळली. ह्याचा परिणाम असा, कीं १९५७–५८ मधील राष्ट्रीय उत्पन्न घटलेलें असण्याचा संभव आहे.

घाऊक किंमतीचा निर्देशांक ४% वाढला. अन्नाच्या किंमतीच्या निर्देशांकानें ९% वाढ दाखविली. सरकारनें धान्याची आयात पूर्वीपेक्षा ज्यास्त केली आणि नियंत्रित दरानें धान्यपुरवठा करणारीं दुकानें उघडलीं. धान्याच्या साठेबाजीविरुद्ध कडक उपाय योजले. रिझर्व्ह बँकेनें धान्याचे तारणावरील कर्जविषयक धोरण अधिक आवळतें केलें.

आयातीवरील नियंत्रणें आणखी वाढविलीं, तरी परराष्ट्रीय हुंडणावळीवरील ताण कमी होऊं शकला नाहीं. निर्गतींत ५७ कोटी रुपयांची घट झाली, त्याचाहि दुष्परिणाम झाला. सरकारनें निर्गतीस उत्तेजन देण्यासाठी बरेच उपाय योजले, सवलती दिल्या. १९५६ मध्यें रिझर्व्ह बँकेच्या परदेशांतील शिलकांत १९९ कोटी रुपयांची आणि १९५७ मध्यें ३२७ कोटी रुपयांची घट झाली होती; १९५८ मधील घट १०९ कोटी रुपयांची आहे.

ह्या सर्व परिस्थितीचा बँकांच्या कर्जपुरवठ्यावर परिणाम होणें स्वाभाविक होतें. खाजगी उपक्रमांतील गुंतवणूक कमी झाल्यामुळें बँकांचा कर्जपुरवठा बेतानेंच वाढला. मोसमी वाढ पूर्वीच्या दोन वर्षांच्या मानानें कमी प्रमाणांत झाली आणि मंदीच्या काळांत बँकांकडे परत पैसे आले तितके कोणत्याच वर्षीं आले नव्हते. ठेवींत वाढ बरीच झाली, त्यामुळें बँकांना पैशाच्या बाबतींत कांहींच अडचण वाटली नाहीं.

१९५७ मध्यें बँकांकडील ठेवींत २२१·५ कोटी रुपयांची भर पडली होती; १९५८ मध्यें २१५·२ कोटी रुपयांची भर पडली. अमेरिकेचे कौंटरपार्ट फंड आणि आणखी पांच बँकांचा शेड्यूल्ड बँकांच्या यादींत प्रवेश, ह्यामुळें ठेवींत बरीच वाढ दिसून आली, तरी बँकिंगची सवय आणि ठेवींची रक्कम ५०,००० आणि त्यापेक्षा कमी वस्तीच्या ठिकाणीं प्रसार पावत आहे असें स्पष्टपणें दिसत आहे. सेव्हिंग्ज खात्यांची वाढ हें त्याचेंच निदर्शक आहे. बँकांचा, विशेषतः स्टेट बँकेचा शाखाविस्ताराचा कार्यक्रम ह्या प्रवृत्तीला हातभार लावीत आहे.

शेड्यूल्ड बँकांच्या ठेवींत २१८·६ कोटी रु. ची भर पडली, त्यापैकीं ९६·१% वाढ २५ कोटी रु. पेक्षा जास्त ठेवी असलेल्या बँकांतच झाली. १०० कोटी रु. पेक्षा जास्त ठेवी असणाऱ्या तीन बँकांकडेच एकूण वाढीच्या ५६·६% रक्कम गेली. बिगर–शेड्यूल्ड बँकांच्या ठेवींत ३·४ कोटी रु. ची घट झाली. पण, ५ मोठ्या बिगर-शेड्यूल्ड बँका शेड्यूल्ड बँकांच्या वर्गात दाखल झाल्या हें त्याचें प्रमुख कारण आहे.

बँकांनीं दिलेल्या कर्जांत फक्त ११·१ कोटी रु. ची वाढ झाली. १९५७ व १९५६ मध्यें ती वाढ अनुक्रमें ७४·६ आणि १५१·३ कोटी रुपयांनीं झाली होती. बँकेकडून कर्जे घेऊन त्यांचा उपयोग सोडतीचे व्यवहार करण्याकडे होऊं न देण्याचें रिझर्व्ह बँकेचें धोरण १९५८ मध्यें कर्जे न वाढण्यास मुख्यतः कारणीभूत आहे. ठेवींत मोठी वाढ पण त्यामानानें कर्जांत माफक वाढ, ह्यामुळें कर्जांचें ठेवींशीं प्रमाण ६३·२% वरून ५४·८% पर्यंत उतरलें. २५ लक्ष रु. पेक्षा ज्यास्त ठेवीवाल्या बँकांचीं कर्जे १८·२ कोटी रु. नीं वाढलीं; त्यापेक्षा लहान बँकांची ७·१ कोटी रु. नीं कमी झाली.

ह्याचा स्वाभाविक परिणाम म्हणजे बँकांच्या इन्व्हेस्टमेंटमध्यें २०६·२ कोटी रु. ची भर पडली. एवढी मोठी भर गेल्या कित्येक वर्षांत पडली नव्हती. सहाजीकच, इन्व्हेस्टमेंटचें ठेवींशीं प्रमाण ३७·२% चें ४५·३% पर्यंत वाढलें. इनव्हेस्टमेंटमधील वाढीपैकी २०२·३ कोटी रु. ची वाढ एकट्या सरकारी रोख्यांत झाली. शेड्यूल्ड बँकांनीं रिझर्व्ह बँकेकडून फक्त ३८·७ कोटी रु. कर्जाऊ घेतले; १९५७ अखेर ४४·९ कोटी रु. घेतले होते.

१९५३ सालापासून बँकांचे नफे दरसाल वाढत होते. ही प्रवृत्ति १९५८ मध्यें बदलली. बँकांच्या खर्चांत उत्पन्नाच्या; मानानें जास्त वाढ झाली. २५ मोठ्या (५ कोटी रु. पेक्षा जास्त ठेवी असलेल्या) बँकांचें उत्पन्न १०·७ कोटी रु. नीं वाढून तें ६४·४ कोटी रु. झालें; पण खर्चहि ११·३ कोटी रु. नीं वाढून तो ५६·५ कोटी रु. झाला. खर्चांतील ह्या वाढीपैकी ७·७ कोटी रु. ठेवींवरील वाढत्या व्याजाचे आहेत, हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे. दरें व्याजाचा बोजा वाढला, पण कर्जास मागणी पुरेशी आली नाहीं. १९५७ मध्यें एकूण ८·५ कोटी रु. नफा झाला होता, तो १९५८ मध्यें ७·९ कोटी रु. वर उतरला.

**२५ प्रमुख शेड्यूल्ड बँकांचें उत्पन्न व खर्च**
**( आंकडे कोटी रुपयांचे )**

| | १९५७ | १९५८ |
|---|---|---|
| ठोक उत्पन्न | ५३·७ | ६४·४ |
| (१) व्याज व डिस्कौंट | ४१·० | ५१·४ |
| (२) इतर उत्पन्न | १२·७ | १३·० |
| एकूण खर्च | | |
| (१) दिलेलें व्याज | ४५·२ | ५६·५ |
| (२) पगार वगैरे | १८·३ | २१·२ |
| (३) इतर खर्च | ६·३ | ७·० |
| निव्वळ नफा | ८·५ | ७·९ |

## कै. श्री. कृ. ज. जोशी ह्यांस श्रद्धांजलि

( लेखक : श्री. त्र्यं. वि. निसळ, बी. ए., आय. आय बी. )

नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. अहमदनगर, या बँकेचे जनरल मॅनेजर श्री. कृ. ज. जोशी कॉरोनरी थ्रॉबोसीसचे विकारानें रविवार ता. ३-५-५९ रोजीं रात्रीं ११॥ वाजतां मुंबईस अकस्मात दिवंगत झाले. श्री. जोशी हे नुकतेच नगरला आले होते. ता. २६-४-५९ ला येथून मुंबईस गेले. दुसरे दिवशीं त्यांची छाती दुखूं लागली म्हणून त्यांना दादरच्या सद्गुरु नर्सिंग होममध्यें ठेवण्यांत आलें तेथें त्यांची प्रकृति सुधारत होती. परंतु रविवार ता. ३-५-५९ ला रात्रीं ११॥ वाजतां झोपेंतच त्यांचें देहावसान झालें. त्यांचें शव नगर येथें आणण्यांत आलें.

श्री. जोशी यांचें घराणें नेवासें तालुक्यांतील वरखेडें या गांवचें. त्यांचा जन्म पारनेर येथें १९०७ सालीं झाला. घरच्या निकृष्ट परिस्थितीमुळें मॅट्रिकपर्यंतच त्यांचें शिक्षण झालें. रेल्वे, कोर्ट, इत्यादि ठिकाणीं तात्पुरत्या नोकऱ्या त्यांनीं केल्या. ऑगस्ट १९२८ मध्यें ते बँकेंत कारकून म्हणून दाखल झाले. पुढील वर्षी पुण्यास अकौंटन्सी शिकण्यास गेले. पूना स्कूल ऑफ कॉमर्समधून शिक्षण घेऊन परत बँकेंत आले. १९३२ सालीं मिलिटरी कँटीन प्रेसमध्यें बँकेंतून रजा घेऊन नोकरी केली. १९३४ सालीं बँकेचे मॅनेजर श्री. म. य. जोशी निवृत्त झाल्यानंतर श्री. कृ. ज. जोशी यांची मॅनेजर म्हणून नेमणूक झाली. नंतर बँकेची रौप्यज्युबिली प्रा. वा. गो. काळे यांचे अध्यक्षतेखालीं झाली. नवी इमारत झाली, तसेंच सेफ डिपॉझिट व्हॉल्ट झाले; संगमनेर, वांबोरी, श्रीरामपूर, येथें शाखा उघडून बँकेचा विस्तार वाढला. पूर्वी बँकेचें काम जुन्या पेढीसारखें चालूं असे; पण १९३४ नंतर अद्यावत बँकेप्रमाणें काम चालू झालें. त्यावेळचे बँकेचे चेअरमन श्री. कुं. सो. फिरोदिया यांचे मार्गदर्शनाखालीं बँकेची सुधारणा व वाढ झाली. १९४२ नंतर धान्यटंचाई सुरू होतांच नगर येथें फेअरप्राईस ग्रेन शॉप सुरू झालें. त्याचे श्री जोशी ऑ. सेक्रेटरींपैकीं एक होते. त्या कामाचा अनुभव पाहून सरकारनें त्यांची नगर येथें रेशनिंग सुरू होतांच रेशनिंग ऑफिसर म्हणून नेमणूक केली व बँकेनेंहि त्यांना तें काम करण्याची परवानगी दिली. रेशनिंग ऑफिसर म्हणून एक वर्ष त्यांनीं उत्तम काम केलें. १९४७ सालीं बँकेचे जनरल मॅनेजर म्हणून त्यांची नेमणूक झाली. बँकेंतून रजा घेऊन मुंबईच्या व्यापारी फर्ममध्यें एक-दोन वेळीं त्यांनीं कामें केलीं. तसेंच गंगापूर येथें 'गंगापूर शुगर मिल्स लि.' सुरू करण्यांत त्यांनीं प्रामुख्यानें पुढाकार घेतला होता. बँकेतर्फे होलसेल कापड वांटप, निर्वासितासाठीं विसापूर कँपवर प्रोव्हिजन स्टोअर, बर्मा तांदूळ व ओव्हरसीज गहूवांटप, वगैरे कामें यशस्वी रीतीनें कार्यान्वित करण्यांत आलीं. बँक ही सहकारी क्षेत्रांत अग्रेसर व नमुनेदार गणली जाते. या सर्व यशांत श्री. जोशी यांचा मोठा वांटा आहे. याशिवाय इतरहि सार्वजनिक संस्थांत ते खजिनदार म्हणून कार्य करीत असत.

त्यांचा स्वभाव मनमिळाऊ, उत्साही असा होता. सेवकवर्गास ते आपुलकीनें मदत करीत असत. वेळेवर ऑफीसमध्यें उपस्थित राहणें, प्रत्येक काम तत्परतेनें पार पाडणें; याबद्दल त्यांचा विशेष कटाक्ष असे. आळस त्यांना ठाऊक नव्हता. कर्तव्यदक्षता, चिकाटी व चोख अशी वागणूक, ह्यामुळें त्यांचा मित्रपरिवार खूप मोठा होता. त्यांचेमागें त्यांची पत्नी व तीन मुली आहेत. त्यांचे मृत्यूनें नगरच्या सहकारी व सार्वजनिक क्षेत्रांतील एक मोठा कार्यकर्ता नाहींसा झाला आहे. ईश्वर त्यांचे आत्म्यास सद्गति देवो !

### अंतरिक्षांतील प्रवासासाठी योगशास्त्राचा उपयोग

रशिआनें व त्याच्या मागून अमेरिकेनें पृथ्वीभोंवतीं फिरणारे अंतरिक्षगामी उपग्रह यशस्वी रीत्या सोडल्यापासून आकाशभ्रमणाची शक्यता निदान कल्पनेच्या क्षेत्रांत आली. अंतरिक्षांतील प्रवास मानवी शरीराला कसा काय झेपेल हें अजमावण्यासाठी कुत्रीं, उंदीर, इत्यादि प्राण्यांवर प्रयोगहि करण्यांत आले. अद्याप उपग्रहाच्या पाळण्यांत बसून मनुष्यानें पृथ्वीचा पाश तोडलेला नाहीं. मनुष्याच्या अंतरिक्ष प्रवासाच्या प्रयत्नांत असलेल्या अडचणींपैकीं वरच्या विरळ वातावरणांत श्वासोच्छ्वास करणें ही मुख्य अडचण आहे. अंतरिक्ष प्रवासासाठी तयार करण्यांत येणाऱ्या माणसांना भारतामधील योगशास्त्राचें — विशेषतः प्राणायामाचें — शिक्षण देण्यांत येत आहे, असें समजतें. निरनिराळ्या अवघड योगक्रियांमध्यें मनुष्याचा श्वास कसा चालतो हे दाखविण्यासाठी कांहीं महिन्यांपूर्वी एक भारतीय योगी अमेरिकेंत गेला होता. त्याच्यावर शास्त्रीय प्रयोग करून प्राणायामाचें मूल्यमापन शास्त्रज्ञांनीं केलें. प्राणायामाच्या शास्त्राचा अंतरिक्ष प्रवासासाठी चांगला उपयोग होईल असें शास्त्रज्ञांना आढळून आलें. योगशास्त्र ही भारताची जागतिक संस्कृतीला एक अमोल देणगी आहे असें तज्ज्ञांचें मत आहे. पण, युरोपीय यंत्रविद्येचा भारतांत प्रसार झाल्यापासून भारताच्या सर्वच विद्या-कलांकडे अवहेलनेनें पहाण्याची प्रवृत्ति सुशिक्षितांत बळावली. त्याचा एक परिणाम म्हणून योगविद्येकडेहि अश्रद्धेनें पहाण्यांत येऊं लागलें. तथापि, गेल्या कांहीं वर्षांत परदेशांतील शरीरशास्त्रज्ञ योगविद्येविषयीं जिज्ञासा दाखवूं लागल्यामुळें आतां हवा बदलली आहे. ह्या विद्येंतील भोंदूपणा दूर करून ती खऱ्या स्वरूपांत प्रकट होऊं लागली तर तें इष्टच होईल.

---

### भोपाळ येथील विद्युत् यंत्रसामुग्रीचा कारखाना

भारतामधील खेड्यापाड्यांतून सुद्धां विजेचा पुरवठा करण्याचें कार्य चालू आहे. विजेच्या निर्मितीसाठी जी भारी यंत्रसामुग्री लागते ती आतांपर्यंत परदेशांकडून आयात करावी लागत आहे. वीज-पुरवठ्याच्या कार्यक्रमांत ही मोठी अडचण आहे. ती दूर करण्यासाठी मध्यवर्ति सरकारनें भोपाळ येथें अशी यंत्रसामुग्री निर्माण करण्याचा कारखाना काढण्याचें ठरविलें. कारखान्याच्या उभारणीला प्रारंभ झाला आहे. १९६१ सालीं तो आपली सर्व उत्पादनक्षमता उपयोगांत आणूं लागेल. कारखान्यांत उत्पादन होऊं लागलें म्हणजे भारताच्या परदेशीय चलनाच्या खर्चांत खूपच बचत होऊं लागेल. विजेच्या निर्मितीची यंत्रसामुग्री पुरेशा प्रमाणांत आयात करणें शक्य नसल्यानें निरनिराळ्या राज्यांतील वीजनिर्मितीचें दरडोई प्रमाण विषम झालें आहे. भोपाळ येथील कारखाना उभा झाल्यावर तो चालविण्यासाठी तज्ज्ञ नोकरांची गरज लागेल. हा नोकरवर्ग शिकवून तयार करण्याचें काम निरनिराळ्या केंद्रांत चालूं आहे. पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस भारतामधील दरडोई विजेच्या खपाचें प्रमाण २५ किलोवॅट इतकें होतें. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस तें दुप्पट, म्हणजे ५० किलोवॅट होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. विजेच्या दरमाणशीं खपावरून त्या त्या देशाची औद्योगीकरणाची प्रगति अजमावतां येते हें खरें. पण, हा सर्वसामान्य नियम प्रगत देशांना जितका लागू होईल तितका भारताच्या बाबतींत होणार नाहीं. कारण, विजेच्या अनुषंगानें ज्या इतर सामान्य सुखसोयी असतात त्यांचीहि तरतूद करण्यांत आली पाहिजे.

## आजचा जपान व त्यांतील उद्योगधंदे

### खडकाळ जमिनींतील खडतर तपश्चर्या

जपानमध्यें सुमारें १,००० बेटांचा समावेश होतो, त्यांतील होकाइडो, होनशु, शिकोकु व क्युशु हीं बेटें सुमारें १,१५० मैलांवर पसरलेलीं आहेत. जपानचें एकूण क्षेत्रफळ सुमारें १,४३,००० चौरस मैल आहे; म्हणजे तें इटलीच्यापेक्षा थोडें मोठें आणि फ्रान्सच्यापेक्षा थोडें लहान आहे.

जपानमध्यें महत्त्वाचा कच्चा माल फारसा उपलब्ध नाहीं; फक्त १५% क्षेत्र लागवडीस योग्य असें आहे. ८०% क्षेत्र डोंगराळ आहे. पर्वतांचें सर्वांत उंच शिखर मौंट फुजी हें १२,३७८ फूट उंच असून सुमारें १,००,००० लोक तें काबीज करण्याचा दरसाल प्रयत्न करतात.

जपानची हवा समशीतोष्ण आहे. परंतु दरवर्षी त्या देशावर कांहींतरी नैसर्गिक आपत्ति कोसळते. त्यामुळें पिकांचा फार नाश होतो. खतांचा भरपूर वापर, कौशल्य आणि सततोद्योग ह्यामुळें जपानी शेतकरी आपल्या शेतांत भरपूर पीक काढूं शकतात. जपानला लागणाऱ्या अन्नापैकीं २७% अन्न आयात करावें लागतें. गेल्या महायुद्धानंतर जपानच्या जमीनविषयक कायद्यांत खूपच सुधारणा करण्यांत आली. आतां ८२% शेतकरी जमीन-मालक आहेत.

मासेमारीच्या बाबतींत जपान अग्रेसर आहे. दरसाल ४५ लक्ष टन मासे पकडण्यांत येतात. कल्चर्ड मोत्यांचें उत्पादन, हें जपानचें वैशिष्ट्य आहे

आगबोटी बांधणी, कपास कापड व पोलाद ह्या बाबतींत जपानचा सर्व जगांत उच्च अनुक्रम आहे. यंत्रसामुग्री, रसायनें, चिनीमातीचीं भांडीं, कॅमेरे, रेडिओ, इत्यादींच्या उत्पादनासाठी जपानचा लौकिक मोठा आहे. पडत्या पाण्याच्या शक्तीवर उत्पादन केलेली वीज जपानच्या उद्योगधंद्यांना अपुरी पडते. त्यामुळें कोळसा जाळून वीज करणारीं मोठीं वीजगृहें उभारावीं लागलीं आहेत. युद्धापूर्वीच्या मानानें आतां विजेसाठी मागणी दुप्पट आहे.

ऑक्टोबर १९५७ मध्यें जपानची लोकसंख्या ९ कोटी भरली. जननाचें प्रमाण उतरत आहे, पण मृत्यूचें प्रमाण त्याहीपेक्षा जास्त गतीनें खाली जात आहे. त्यामुळें, लोकसंख्येंत दरसाल १० लाखांची भर पडत आहे.

चीन, भारत, रशिआ, अमेरिका ह्यांच्या खालोखाल जपानचा लोकसंख्येच्या दाटीच्या दृष्टीनें अनुक्रम लागतो. इतर देशांत आणखी लोकसंख्येस भरपूर वाव आहे, पण जपानचें क्षेत्र अत्यंत मर्यादित आहे. जपानमध्यें प्रत्येक चौरस मैलास ६२५ लोकसंख्या, असें प्रमाण पडतें. नेदरलँड्स व बेल्जम ह्या दोनच देशांत लोकसंख्या ह्यापेक्षा दाट आहे. पण, जपानच्या क्षेत्रापैकीं फक्त १५% क्षेत्र लागवडीस योग्य आहे आणि लागवडीखालील प्रत्येक चौरस मैलास ४,२८० लोकांचें पोषण करावें लागतें, ही गोष्ट लक्षांत ठेवायला हवी.

लागवडीस योग्य अशी अपुरी जमीन व महत्त्वाच्या कच्च्या मालाचा तुटवडा अशा प्रतिकूल परिस्थितींत वाढत्या लोकसंख्येच्या उपजीविकेचा प्रश्न जपानमध्यें दिवसेंदिवस अधिकाधिक गंभीर होत आहे.

तथापि, जपानमधील उद्योगपति व कुशल कामगार ह्यांनीं जपानला अशा अडचणींतूनहि आपल्या देशाला औद्योगिक प्रगतीच्या शिखरावर नेऊन पोंचविलें आहे. कारखाने, खाणी व बांधकाम ह्यांत राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३०% उत्पन्न गुंतून त्यांतून निर्गतीसाठी मालाचें उत्पादन केलें जातें. ३७% प्रजा शेतकामांत गुंतलेली आहे.

जपानचा प्रदेश खडकाळ असल्यामुळें बोगदे, पूल, बांध, इत्यादि कामांसाठी स्थापत्य शास्त्रज्ञांना आपल्या कौशल्याची कमाल करावी लागते. जपानमधील रेल्वेरस्त्यांची लांबी १७,००० मैल असून त्यापैकीं ६,२०० मैलांचें विद्युत्करण झालेलें आहे. विमानवहातूक कंपन्या अंतर्गत व आंतरदेशीय वहातूक करतात. मालवाहू बोटींची संख्या २,४०० असून त्यांचें टनेज ४८,००,००० आहे.

---

### रेल्वेची कांहीं सामुग्री छोट्या उद्योगधंद्यांकडून खरेदी करणार

रेल्वेसाठी लागणारी कांहीं विशिष्ट सामुग्री केवळ छोट्या उद्योगधंद्यांकडून खरेदी करण्यास रेल्वेबोर्डानें मान्यता दर्शविली आहे. नॅशनल स्मॉल स्केल इंडस्ट्रिज् कॉर्पोरेशन आणि रेल्वे-बोर्ड यांच्या दरम्यान झालेल्या यशस्वी वाटाघाटींचा हा परिपाक आहे. या निर्णयानुसार सर्व बिल्ले, पैसे ठेवण्याच्या पिशव्या, कातडी, पेट्या, कातडी पिशव्या, बूट, चपला, सॅन्डल्स, धुण्याचा साबण, मेटल पॉलिश, काथ्या, सुती व लोकरी होजिअरी, इत्यादि वस्तू केवळ छोट्या कारखानदारांकडूनच घेतल्या जातील

अभिनव गुंतवणूक

आपणांस आपल्या पैशाचा योग्य मोबदला

(शेड्यूल्ड बँक) बँक ऑफ पूना, लिमिटेड

याच्या

तीन – सहा – नऊ – बारा महिने मुदतीच्या ठेवींनें मिळतो.

कॅशसर्टिफिकेट इतकेंच व्याज व्याज मिळून शिवाय रकमेची जरूर भासली
तर १ ते ५ वर्षे थांबावें लागत नाहीं. व्याज मुदत पुरी झाल्याबरोबर मिळतें व याच रकमेवर पुन्हां व्याज
मिळवितां येते. मुख्य ऑफिस अगर शाखाकचेऱ्यांकडे समक्ष चौकशी करा.

गो. गं. साठे, मॅनेजर.

### दांडेली येथील कागदाच्या कारखान्याचें उद्घाटन

मध्यवर्ती सरकारचे अर्थमंत्रि श्री. मोरारजी देसाई ह्यांनीं म्हैसूर राज्यांतील दांडेली येथें उभारण्यांत आलेल्या कागदाच्या कारखान्याचें औपचारिक उद्घाटन केलें. गिरणीचे चेअरमन श्री. एन्. डी. बंगूर ह्या प्रसंगीं म्हणाले, "भारत आज औद्योगिक क्रांतीच्या उंबरठ्यावर उभा असून अडचणी असून सुद्धां तो वेगानें प्रगति करीत आहे. ह्या औद्योगीकरणाच्या कार्यांत व्यापारी व उद्योगपती ह्यांनीं आपला वांटा उचलणें आवश्यक आहे. भारतांत दरडोई कागदाच्या खपाचें प्रमाण फार थोडें आहे. अर्थातच कागदाच्या खपास अजून खूप वाव आहे हें उघडच आहे. भारतांत दरडोई कागदाचा खप २ पौंड आहे तर अमेरिकेंत तो २९८ पौंड आहे." अर्थमंत्रि श्री. मोरारजी देसाई म्हणाले, "कोणत्याहि धंद्यास लागणारी यंत्रसामुग्री व तिचे सुटे भाग देशांतच तयार करण्यांत आले पाहिजेत. ह्या बाबतींत जपानचें उदाहरण डोळ्यांसमोर ठेवण्यासारखें आहे, जपानसारख्या औद्योगिक देशांकडे पाहिल्यावर भारताला अद्याप किती मार्ग आक्रमण करावयाचा आहे तें लक्षांत येतें." दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत कागद व कागदासाठी लागणारा लगदा तयार करणारी स्वयंपूर्ण अशी ही एकच गिरणी उभारण्यांत आली आहे. गिरणीच्या उभारणीसाठी ५ कोटी रुपये खर्च आला आहे. काळी नदीच्या कांठीं ती बसलेली असल्यामुळें गिरणीला पाण्याचा मुबलक पुरवठा होऊ शकेल. दांडेलीच्या आसमंतांत असलेल्या बांबूच्या बनांतून दरसाल ६०,००० टन कागद तयार करण्या-इतका बांबूहि मिळू शकेल.

---

### सक्तीच्या विमायोजनेचा विचार चालू

भांडवलाचा संचय करण्याच्या मार्गांत, खुषीची बचत करणें व वाचविलेला पैसा उद्योगधंद्यांत गुंतविणें हा एक प्रमुख मार्ग आहे. तथापि हा मार्ग सर्वच देशांत सर्वकाळीं उपयोगी पडण्या-सारखा नसतो. भारतांत सध्यां ज्या वेगानें औद्योगीकरण चालूं आहे तो वेग टिकविण्यासाठींसुद्धां ह्या मार्गानें होणारा भांडवलाचा संचय अत्यंत अपुरा पडत आहे. म्हणूनच परदेशी मदत आणि सरकारचा भांडवली खर्च ह्यांचा अवलंब करावा लागत आहे. औद्योगीकरणाची गति थोड्याफार अंशानें कां होईना चलनवृद्धीवर अवलंबून असली म्हणजे लोकांना खुषीची बचत करणें महागाईमुळें कठीण जातें. तेव्हां बचत करण्याचे अन्य मार्ग शोधणें प्राप्त होतें. भारताच्या नियोजन समितीचे एक सभासद् श्री. श्रीमन् नारायण ह्यांनीं अशी माहिती सांगितली आहे कीं, छोट्या रकमांची बचत लोकांकडून करवून घेण्यासाठी आयुर्विमा सक्तीचा करण्याचा नियोजन समिति विचार करीत आहे. 'राष्ट्रीय नियोजनांत विम्याचें स्थान' ह्या विषयावर दिल्ली येथील इन्शुरन्स इंस्टिट्यूटपुढें ते बोलत होते. विम्याविषयीं बोलतांना ते म्हणाले, "विम्यानें कुटुंबाचें हित रक्षिलें जातें हें तर खरेंच. पण विम्याच्या योगानें समाजानें केलेली बचत आर्थिक विकासासाठी उपयोगी पडते हाहि महत्त्वाचा मुद्दा आहे. छोट्या छोट्या रकमा बचत करून शिल्लक टाकतां याव्या म्हणून निरनिराळ्या प्रकारच्या सक्तीच्या विमायोजना आंखण्यांत येत आहेत. खाजगी उद्योगधंद्यांत अगर सार्वजनिक मालकीच्या उद्योगधंद्यांत काम करणाऱ्या ज्या लोकांचे पगार विवक्षित मर्यादेपलीकडे असतील त्यांना आपल्या मुलाच्या शिक्षणासाठी अगर मुलीच्या लग्नासाठी विमे उतरवावयास लावतां येण्यासारखे आहेत."

कण आणि क्षण
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक : – श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान
★ सरदारगृह ★
प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चात मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.




सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
स्थापना १९१८ | सारस्वत बँक गृह, गिरगांव मुंबई ४. |
भारतांतील सर्व केंद्रांतून व्यापारी लोकांच्या हुंड्या व रेल्वे रिसिट यांची वसुली माफक दरानें केली जाते.
विशेष माहिती मुख्य कार्यालय किंवा कोणत्याही शाखेत मिळेल.
शाखा – फोर्ट · दादर · माहिम · वरळी · पुणें · बेळगांव.
महिला शाखा: सारस्वत बँक गृह, गिरगांव मुंबई ४.

### योगविद्येचें शिक्षण देणारी नवीन संस्था

विद्याधन हें सर्वांत श्रेष्ठ प्रकारचें धन आहे, अशी भारतीय संस्कृतीची भावना आहे. अर्थांतच योगविद्येचाहि धनांत समावेश करण्यास हरकत नाहीं. शरीराच्या व मनाच्या आरोग्यासाठीं हटयोगविद्या ही अतिशय उपयुक्त विद्या आहे असें तज्ज्ञांचेंहि मत आहे. अशा ह्या विद्येचें शिक्षण देणारी एक नवीन संस्था जम्मूजवळ कात्रा ह्या ठिकाणीं स्थापन करण्यांत येणार आहे. मध्यवर्ती सरकारनें संस्थेच्या इमारतीसाठीं पांच लाख रुपयांची देणगी मंजूर केली आहे. संस्थेंत विद्यार्थ्यांसाठीं एक वसतिगृह, एक सभागृह, एक वाचनालय, इत्यादींची सोय करण्यांत येणार आहे. स्वामी धीरेंद्र ब्रह्मचारी ह्यांनीं संस्थेच्या स्थापनेच्या कामीं पुढाकार घेतला आहे. संस्थेंत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांनीं दोन वर्षेंपर्यंत योगविद्येचा अभ्यास करावा लागेल. त्यानंतर ते शिक्षक म्हणून देशाच्या निरनिराळया भागांत जातील. स्वामी धीरेंद्र ब्रह्मचारी ह्यांनीं आतांपर्यंत ६०,००० लोकांना योगविद्येची शिकवण दिली आहे. त्यांच्या विद्यार्थ्यांत पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू, अध्यक्ष बाबू राजेंद्रप्रसाद, श्रीमती इंदिरा गांधी, अर्थमंत्रि श्री. मोरारजी देसाई, रेल्वेमंत्रि श्री. जगजीवनराम आणि सर्वोदयवादी पुढारी श्री. जयप्रकाश नारायण ह्यांचा समावेश आहे. गेल्या कांहीं वर्षांत योगशास्त्राबद्दल यूरोप व अमेरिका ह्या देशांत बरेंच सक्रीय कुतूहल जागृत झालेलें दिसतें. इंडोनेशिआमधील स्त्रियांच्या पोलिस पथकाला योगाचें शिक्षण देण्यांत येत आहे. ह्या विद्येभोंवतालीं असणारें गूढतेचें वातावरण नाहींसें करून तिचा व्यावहारिक उपयोग करण्याकडे लक्ष दिलें, तर तें फार उपयुक्त होईल. योग म्हणजे कर्में करण्यांतील कुशलता, हें वचनहि ह्या बाबतींत ध्यानांत घेण्यासारखें आहे.

---

### मॉस्कोची लोकसंख्या मर्यादित ठेवण्याची योजना

आधुनिक यंत्रयुगाचा एक परिणाम सर्व जगभर दिसून येतो. तो म्हणजे मोठ्या शहरांची होणारी अप्रमाण वाढ. अमेरिका, ब्रिटन, इत्यादि भांडवलदारी राष्ट्रांतच ही प्रवृत्ति दिसून येते असें नाहीं रशिआसारख्या समाजवादी राष्ट्रांतहि हीच प्रवृत्ति दिसून येते. मोठ्या शहरांच्या वाढीमुळें मग घरें, वाहतूक, पाणीपुरवठा, इत्यादि अनेक प्रकारचे प्रश्न उत्पन्न होतात आणि ते अधिकच गुंतागुंतीचे होत जातात. मुंबई शहरासंबंधीं बर्वे कमिटीनें जो अहवाल नुकताच केला आहे त्यामध्यें शहरांच्या वाढीमुळें उत्पन्न होणाऱ्या प्रश्नांचें स्वरूप चांगलें स्पष्ट करण्यांत आलें आहे. रशिआनें आपला जो सप्तवार्षिक कार्यक्रम जाहीर केला आहे त्यांत शहरांच्या लोकसंख्येवर मर्यादा घालण्याची योजना समाविष्ट केली आहे. वास्तविक १९३५ सालींच मॉस्कोची लोकसंख्या ५० लाखांच्या वर जाऊं देऊ नये असें ठरविण्यांत आलें होतें. परंतु युद्धाची शक्यता, नंतर झालेलें दुसरें महायुद्ध आणि त्यानंतरची गोंधळाची परिस्थिति ह्यांच्यामुळें ही मर्यादा काटेकोर रीतीनें पाळण्यांत आली नाहीं. आतां मात्र मॉस्कोच्या शहर-समितीनें असें ठरविलें आहे कीं बाहेरील लोकांच्या स्थलांतरामुळें शहराची लोकसंख्या ५० लाखांपेक्षा वाढूं द्यावयाची नाहीं. खुद्द मॉस्को शहराच्या परिसरांत आजच लोकवस्ती दाट झालेली आहे. म्हणून शहराच्या कक्षेबाहेर उपनगरें बांधण्याचा निर्णय घेण्यांत आला आहे. जळण म्हणून कोळसा व लांकूड ह्यांचा वापर सध्यां करण्यांत येतो. पण पुढील सात वर्षांच्या अवधींत नैसर्गिक वायूचा पुरवठा करून जळणाचा प्रश्न सोडविण्यांत येईल. मॉस्कोपासून दूर अंतरावर असणाऱ्या ठिकाणाहून नळांच्या साह्यानें हा वायु पुरविण्यांत येणार आहे.


स्थापना १९३६

**दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा**

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस–पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा शहर.
शाखा–मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, बार्शी, नासिक, लोणंद, कोल्हापूर, इलकर्णी, इचलकरंजी व फलटण.
लौकरच मुंबई दादर भागांत शाखा सुरू करणेंत येत आहे.

ता. ३१-१२-५८ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,९०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | ४,४३,००० |
| ठेवी | रु. | १,५०,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,७१,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष ते दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|
| रु. ३·०० | रु. ३·१५ | रु. ३·५० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४·००

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरमाल दर शेंकडा | १·०० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ,, | १·५० |
| चालू डिपॉझिट | ,, | ०·५० |

सेव्हिंग्ज बँक व से. डिपॉझिट खात्यावर नवीन आकर्षक नियम तयार केले असून व्याजाचे दरांतहि वाढ केली आहे. त्याबद्दलची सविस्तर माहिती आमचे कोणत्याहि शाखेंत मिळूं शकेल.

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन



नेहमींच प्रगतिपर व सुरक्षित

**दि बेळगांव बँक लिमिटेड**

**बेळगांव**

( शेड्यूल्ड बँक )

स्थापना १९३०

★ नियमित बचत केल्यानें कुटुंबाची व राष्ट्राची शक्ति वाढीस लागते.

★ कुटुंबांतील मंगलकार्ये, उच्चशिक्षण किंवा घरबांधणी हीं मोठ्या खर्चाचीं कामें पार पाडण्यासाठी नियमित बचत करणें अगत्याचें ठरतें.

★ बेळगांव बँकेंत क्युम्युलेटिव्ह डिपॉझिटचें वा होम-सेव्हिंगजचें खातें उघडून आपणांस ही तरतूद योग्य रीतीनें करतां येतें.

व्याजाचे आकर्षक दर.

आपल्या सव्वीस शाखांतून सेवावृत्तीनें व्यापार व बचत याची नेहमींच वाढ करीत असलेली

**दि बेळगांव बँक लिमिटेड.**

एच्. एस्. कुलकर्णी
जनरल मॅनेजर

## राष्ट्रधन

### गो. से. अर्थ वाणिज्य महाविद्यालय, नागपूरचें वार्षिक प्रकाशन

नागपूर येथील गो. से. अर्थ वाणिज्य महाविद्यालयाचें ' राष्ट्रधन ' ह्या नांवानें वार्षिक प्रसिद्ध होत असतें. त्यांत, ह्या व्यापारी कॉलेजांतील शिक्षक आणि विद्यार्थी ह्यांचे अभ्यासपूर्ण लेख प्रसिद्ध होत असतात. चालू आर्थिक आणि व्यापारी प्रश्नांपैकी एखादा विशेष महत्त्वाचा प्रश्न निवडून, त्या प्रश्नाला वाहिलेल्या विशेषांक प्रसिद्ध करावयाचा, अशी त्याची प्रथा आहे. त्याप्रमाणें नियोजन, बेकारी, लघु उद्योग, विशाल उद्योग, इत्यादीं विषयक खास अंक आजवर प्रसिद्ध करण्यांत आले. १९५९ चा अंक 'विकास' अंक म्हणून प्रसिद्ध करण्यांत आला आहे त्यांत गेल्या दहा वर्षांतील विकासप्रगतीचा आढावा घेण्यांत आला आहे. प्रारंभीं श्री. यशवंतराव चव्हाण, श्री. श्रीमन्नारायण, श्री. एस. के. वानखेडे, श्री. जी. बी. बडकस, डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव, श्री. गुलझारीलाल नंदा, इत्यादींचे संदेश देण्यांत आले आहेत. त्या सर्वांनीं "राष्ट्रधना"च्या उपक्रमाचें स्वागत केलें आहे. वार्षिकाचे हिंदी, मराठी व इंग्रजी असे तीन विभाग आहेत आणि त्या तिन्हींत मिळून १५ + १७ + १० = ४२ माहितीपूर्ण लेख देण्यांत आले आहेत. एकेका विषयाची सामुग्री एकत्रित दिल्यामुळें त्या विषयाचा सर्व दृष्टिकोनांतून अभ्यास होण्यास उत्कृष्ट मदत होते, ही महत्त्वाची गोष्ट आहे.

' राष्ट्रधना 'च्या संपादक मंडळांत प्राचार्य मिल्खीराम तोसी, (अध्यक्ष), प्राचार्य म. अ. चान्सरकर (उपाध्यक्ष), श्री. महावीर बजाज ( प्रमुख संपादक ), श्री. सुरेंद्रकुमार जैन (हिंदी विभाग), श्री. अशोक मोहोकर ( मराठी विभाग, ) श्री. नरेंद्रकुमार कुकडे ( इंग्रजी विभाग ) व श्री. नारायणसिंह चौहान ( कला विभाग ) ह्यांचा समावेश आहे.

## रेडिओला लागणाऱ्या व्हाल्व्सचें उत्पादन

रेडिओमध्यें वापरण्यांत येणाऱ्या व्हाल्व्सचें उत्पादन आतां भारतांत होऊं लागणार आहे. सरकारच्या मालकीची भारत इलेक्ट्रॉनिक्स कंपनी आणि हॉलंडमधील फिलिप्स कंपनी ह्यांच्या दरम्यान तसा करार करण्यांत आला आहे. फिलिप्स कंपनी भारत इलेक्ट्रॉनिक्स कंपनीला १० वर्षेपर्यंत तांत्रिक साह्य देणार आहे. भारतामधील इलेक्ट्रॉनिक्सच्या धंद्याच्या दृष्टीनें हा करार म्हणजे एका नव्या कालखंडाची नांदीच ठरणार आहे. प्रक्षेपित ध्वनि ग्रहण करण्यासाठी जे अनेक प्रकारचे व्हाल्व्स लागतात ते सर्व भारत इलेक्ट्रॉनिक्समध्यें तयार करण्याचें आश्वासन कराराप्रमाणें मिळालें आहे. त्याशिवाय दळणवळणाच्या साधनांत जे विशेष प्रकारचें साहित्य वापरण्यांत येतें त्याचेंहि उत्पादन करण्यांत येणार आहे. लष्कराच्या उपयोगासाठी कांहीं खास प्रकारचे व्हाल्व्स लागतात. त्याच्या उत्पादनाचीहि तरतूद करण्यांत आली आहे. ह्या कामीं लागणारी सर्व प्रकारची तांत्रिक मदत फिलिप्स कंपनी देणार आहे आणि हॉलंडमधील आपल्या कारखान्यांतून हिंदी तंत्रज्ञ शिकवून तयार करणार आहे. संकल्पित कारखान्यांत दरसाल सुमारें १८ लाख व्हाल्व्स तयार करण्यांत येतील. मागणी वाढत गेल्यास कारखान्यांत दुसरी पाळी चालू करून उत्पादन दुप्पट करण्याची व्यवस्था होईल. कारखान्याची सर्व उत्पादनक्षमता कारणी लागली म्हणजे दरसाल ४० ते ५० लाख रुपयांचा माल तयार होऊं लागेल. संपूर्ण उत्पादनक्षमता वापरण्यास तीन वर्षांचा अवधि लागेल. प्रत्यक्ष उत्पादन सुरू होण्यास २० महिने लागतील. कारखाना आपली सर्व उत्पादनक्षमता वापरूं लागल्यावर दरसाल सुमारें ३० लाख रुपयांच्या परदेशीय चलनाची बचत होईल. भारतांत स्वस्त रेडिओ सेट्स तयार करण्याच्या कामीं कारखान्याचा उपयोग होईल.


## नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.

२६ जानेवारी, १९५५ रोजीं नोंदलेल्या ह्या बँकेनें अल्पावधींत केलेल्या प्रगतीचा तक्ता

| | ३०-६-१९५६ | ३०-६-१९५७ | ३०-६-१९५८ | ३१-१२-५८ | ३१-३-५९ |
|---|---|---|---|---|---|
| शाखांची संख्या | ७ | ११ | १२ | १३ | १५ |
| | लक्ष रु. | लक्ष रु. | लक्ष रु. | लक्ष रु. | लक्ष रु. |
| खेळतें भांडवल | ३९·४७ | ७५·३७ | १३३·४८ | १५४·४४ | १६१·४१ |
| शेअर भांडवल | ४·३३ | ९·०० | १४·१७ | १५·५१ | १५·७० |
| ठेवी | ३१·३७ | ४९·११ | ६९·४६ | ७३·८१ | ८४·०२ |
| दिलेलीं कर्जें | २५·९५ | ४४.२२ | ७७·७८ | १०८·७९ | ९१·८६ |
| | तोटा | नफा | नफा | नफा | नफा |
| नफा अथवा तोटा | १२,८९५ | ८,२२४ | ५२,५०६ | ७३२९२ (अर्धें वर्ष) | १ लक्ष ( अंदाज ) |

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.